# आधुनिक जगाची ओझरती ओळख

## S.Y.B.A. - Special - II

## Sem - I ( 2020-21 )

प्रकरण.१ आधुनिक युगाची पायाभरणी

अ) प्रबोधन - पार्श्वभूमी व स्वरूप

ब) धर्म सुधारणा चळवळ - मार्टिन ल्युथर किंग

प्रकरण.२ क्रांतीयुग

अ) अमेरिकन राज्यक्रांती - कारणे व परिणाम

ब) फ्रेंच राज्यक्रांती - कारणे व परिणाम

क) औदोगिक क्रांती - कारणे व परिणाम

प्रकरण.३ राष्ट्रवाद

अ) इटालीचे एकीकरण

ब) जर्मनीचे एकीकरण

क) जपान - मेईजी क्रांती

प्रकरण.४ पहिले महायुद्ध व साम्यवादाचा उदय

अ) पहिले महायुद्ध - कारणे व परिणाम

ब) पॅरीस शांतता परिषद व राष्ट्रसंघ

क) रशियन राज्यक्रांती - कारणे व परिणाम

S.Y.B.A Special-III

प्रकरण नं. 1

# आधुनिक युगाची पायाभरणी

(अ) प्रबोधन पार्श्वभूमी व स्वरूप (ब) धर्मसुधारणा चळवळ

1.1 आधुनिक युगाची पार्श्वभूमी - जगाच्या आधुनिक इतिहास घडविण्यात युरोपियन देशांनी पुढाकार घेतला. या कालखंडातील बहुतेक घटना प्रथम युरोपात घडल्या व हळूहळू त्यांचा प्रभाव जगातील इतर भागांवर पडत गेला. त्यामुळे 'जगाचा आधुनिक इतिहास म्हणजेच युरोपचा आधुनिक इतिहास' असे समीकरण होऊन बसले आहे. जगावर प्रभाव पाडण्याचे सामर्थ्य ज्या घटनेमुळे युरोपला प्राप्त झाले आहे त्याला प्रबोधन (Renaissance) म्हणतात. या प्रबोधन कालखंडापासूनच जगाच्या आधुनिक इतिहासाला प्रारंभ झाला आहे.

* प्रबोधन म्हणजे काय? - "प्रबोधन म्हणजे वैचारिक परिवर्तन घडविणारी बौद्धिक क्रांती होय"

किंवा

"प्रबोधन म्हणजे मुक्त व धाडसी विचारांचा पुनर्जन्म"

किंवा

"प्रबोधन म्हणजे मानवास प्राप्त झालेली सुबुद्ध अवस्था होय"

प्रबोधन चळवळीने मध्ययुगीची सांगता झाली तर आर्वाचीन युगाची सुरुवात झाली. प्रबोधन चळवळीनेच मानवाचा विकास घडून आला म्हणून प्रबोधनास विकासाचे युग असे म्हणतात. मध्ययुगीन अंधश्रद्धा परंपरा यांचा त्याने त्याग केला. जीवनातील प्रत्येक बाबीकडे माणूस वस्तुनिष्ठ व तर्कशुद्ध दृष्टिकोनातून पाहू लागला प्रत्येक गोष्ट तर्काच्या बुद्धीच्या कसोटीवर पाहून तो स्विकारू लागला.

## प्रबोधनाची कारणे - Causes of the Renaissance

कोणतीही ऐतिहासिक महत्वाची घटना एकाएकी घडत नसते तर तिच्यामागे फारमोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी असते. ती विशिष्ट घटना घडण्यासाठी अनुकूल असे वातावरण अगोदरपासून निर्माण झाले असते. प्रबोधनाच्या बाबतीत हा सिद्धांत खरा ठरतो - प्रबोधनाची कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील

(1) धर्मयुद्धे - मध्ययुगात झालेली धर्मयुद्धे हे प्रबोधनाचे एक कारण होय 11 व्या व 12 व्या 13 व्या शतकात युरोपातील ख्रिश्चन धर्मीय व पौर्वात्य तुर्क मुसलमान यांच्या पॅलेस्टाईनच्या प्रश्नावरून 8 मोठी युद्धे झाली

त्यांनाच धर्मयुद्धे म्हणतात. पॅलेस्टाईन ही इस्लाम व ख्रिस्ती धर्म या दोन्ही धर्मांच्या दृष्टीने पवित्र भूमी असल्याने तिच्या प्राप्तीसाठी ख्रिश्चन व तुर्क आपसात लढले. या युद्धात तुर्कांचा विजय झाला. युरोपियन ख्रिश्चनांचा पराजय झाला. पण हा पराभव ख्रिश्चन लोकांच्या दृष्टीने एक वरदानच ठरला. या धर्मयुद्धाचा महत्वाचा परिणाम म्हणजे संस्कृती संगमच होय. या युद्धात पौर्वात्य व पाश्चिमात्य या दोन संस्कृती एकत्र आल्या व त्यांची वैचारिक देवाणघेवाण सुरु झाली. या धर्मयुद्धामुळे युरोपातील ख्रिश्चनांना पौर्वात्य संस्कृतीची ओळख पटली. तुर्की आक्रमणाला कंटाळून ग्रीक, रोमन पंडित आपआपल्या ग्रंथसामुग्री सह युरोपात आले व त्यांनी आपले साहित्य प्रकाशात आणले. प्लेटो व ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्ववेत्त्यांचे तत्वज्ञान अरबी भाषेत भाषांतरित केले होते ते युरोपमध्ये गेले त्याचप्रमाणे बीजगणित, संख्याशास्त्र इ. शास्त्रांची माहिती अरबांनी युरोपियनांना करुन दिली परिणामी आपले ज्ञान अद्ययावत आहे, ख्रिश्चन धर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे या युरोपियन लोकांच्या कल्पनेला तडा गेला. इतर देशांच्या संस्कृतीशी काहीशी

अनुकरणीय आहे हे युरोपियन लेखकांच्या लक्षात आले युरोपियन लेखकांची कूपमंडूक वृत्ती नष्ट झाली त्यांचा ज्ञानविषयक दृष्टीकोन विशाल बनला हा विशाल दृष्टिकोनच प्रबोधनास कारणीभूत ठरला

(२) लेखक व विचारवंतांचे कार्य → मध्ययुगात युरोपातील माणसांवर ख्रिश्चन धर्माचा मोठा पगडा होता. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात धर्मसंस्थेचे वर्चस्व होते धर्मसंस्थेच्या या वर्चस्वामुळे काळाच्या ओघात सर्व-सामान्य माणूस अंधश्रध्दा व परंपराप्रिय बनला होता. त्या चाकोरीच्या बाहेर जाण्याची त्याची तयारी नव्हती. ख्रिश्चन धर्माची खरी तत्वे लोकांना समजत नव्हती. कारण 'बायबल' हा ख्रिश्चन धर्माचा ग्रंथ ग्रीक व लॅटिन भाषेत लिहिला होता. पण या भाषा लोकांच्या बोलीभाषा नसल्यामुळे बायबलमध्ये प्रत्यक्ष काय सांगितले आहे हे त्यांना माहीत नव्हते. त्यामुळे धर्मसंस्था सांगेल तोच धर्माचा अर्थ सामान्य जनतेला मान्य करावा लागत होता. पीटर ॲबेलर्ड, रॉजर बेकन या दोन प्रमुख लेखकांनी ख्रिश्चन धर्मातील चमत्कार, दंतकथा (?) यावर हल्ला केला. जे बुध्दीला पटत नाही त्यावर विश्वास ठेवण्यास त्यांनी

नकार दिला रॉजर बेकनने घोषणा केली की, "अमुक एका ग्रंथात लिहिले आहे म्हणून त्याच्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यापेक्षा प्रयोगांती ती गोष्ट आपल्या बुध्दीस पटली तरच आपण तिचा स्विकार करावा" रॉजर बेकनची ही घोषणा म्हणजे युरोपातील बौध्दीक जागृतीस प्रारंभ होय. ख्रिश्चन धर्मसंस्थेतील भ्रष्टाचार कारभारावर त्याने जोरदार टीका केली. बेकनने मोठी जनजागृती केली होती व त्याचे कार्य डान्टे, पेट्रार्क या लेखकांनी पुढे चालू ठेवले त्यामुळे सामान्य माणूस जागा झाला सत्य काय? ढोंग व अंधश्रध्दा कोणत्या हे समजण्याची क्षमता त्याच्यात निर्माण झाली तो चिकित्सक बनला. वस्तुनिष्ठ दृष्टिकोन त्याच्यात निर्माण झाला

③ कॉन्स्टॅन्टिनोपलचा पाडाव — इ.स. 1453 चे शेवटच्या धर्म युध्दात पूर्व रोमन साम्राज्याचा पाडाव झाला त्या ठिकाणी आश्रयास असलेल्या विद्वानांचा तुर्कांनी छळ, व त्यांच्यावर अत्याचार केले त्यामुळे या शहरातील विज्ञान पंडितांनी युरोपातील इतर देशांत आश्रय घेतला (साहित्यीक, कलाकार, तत्ववेत्ते, विद्वान) लोकांनी

ग्रीक विद्या, कला, तत्वज्ञान, विज्ञान इ. प्रचार व प्रसार केला त्यामुळे युरोपात प्रबोधनाच अनुकूल पार्श्वभूमी तयार झाली. हे शहर पूर्व व पाश्चिम यांच्यातील दळणवळणाचे व व्यापाराचे केंद्र होते हे केंद्र शत्रूच्या ताब्यात गेल्याने पूर्वेकडील व्यापार पूर्णपणे बसला. युरोपियन लोकांना नवे मार्ग शोधून काढणे आवश्यक ठरले.

(4) मुद्रणकलेचा शोध — मुद्रणकलेचा शोध ही प्रबोधन चळवळीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाची घटना होती. त्यामुळे छपाईकला अवगत झाली जॉन गेरनबर्ग याने जर्मनीत पहिले छापखाना सुरू केला. त्यामुळे जुन्या ग्रंथांचे पुनर्मुद्रण होऊ लागले. ग्रंथ सर्वसामान्य वाचकांना मिळू लागले. वाचकवर्ग वाढला तसेच इतर नवनवीन लेखकांचे वैचारिक प्रबोधनपर ग्रंथ याच काळात प्रसिद्ध करणे शक्य झाले परिणामी वैचारिक जागृती होण्यास मदत झाली.

(5) सरंजामशाहीचा शेवट — धर्मयुद्धात सरंजामदार सहभागी झाले होते. त्यांनी युद्धात आपलाच विजय व्हावा म्हणून सर्वस्वपणास लावले होते या धर्मयुद्धात ख्रिश्चनांचा पराजय झाला

सरंजामदार दुर्बल झाले. त्यांचा समाजावरील प्रभाव नाहीसा झाला. त्यांच्या दडपणाखाली वावरणाऱ्या लोकांना स्वातंत्र्य मिळाले त्यांनी नवनवीन विचार व कल्पनांचा स्वीकार केला बदलत्या काळाबरोबर ते बदलू लागले.

(6) भौगोलिक शोध –

कॉन्स्टॅन्टिनोपल हे शहर तुर्कांच्या ताब्यात गेल्याने पूर्व व पश्चिम यांच्यातील व्यापार बंद पडला हे शहर युरोप व आशिया खंडाचे प्रवेशद्वार होते हा मार्ग अरबांनी (तुर्क) युरोपियन व्यापाऱ्यांसाठी बंद केला त्यामुळे आता युरोपियन लोकांना नवे भौगोलिक मार्ग शोधून काढणे आवश्यक होते – फिशर हा इतिहासकार म्हणतो " 1453 नंतर भूमध्य समुद्र व तांबडा समुद्र हा पूर्वकडचा मार्ग बंद झाला. त्यामुळे आफ्रिका खंडाला वळसा घालून पूर्वकडे जाण्याच्या कल्पनेचा उदय झाला त्यामधूनच वास्को-द-गामा आफ्रिकेला वळसा घालून भारतात पोहोचला होता" – बार्थोलोमियो डायसने आफ्रिकेचे द. टोक शोधून काढले कोलंबसने अमेरिका खंडाचा शोध लावला. मॅगलेन याने पहिली पृथ्वी

प्रकाशात आली — या भौगोलिक शोधामुळे युरोपच्या आर्थिक फायदा झाला. वसाहतीसाठी त्यांना नवे भूप्रदेश मिळाले प्रबोधन प्रक्रियेस या भौगोलिक शोधांनी हातभार लावला आहे

(7) धर्मसत्ता व राजसत्ता यांच्यातील संघर्ष

रोमन सम्राटांनी ख्रिश्चन धर्माचा प्रसार युरोपभर केला. तथापि सुरुवातीच्या काळात चर्च, धर्मगुरू धर्मसत्तेवर राजेशाहीचे वर्चस्व होते. पुढे रोमचे चर्च व त्यातील पोपचा दबदबा वाढला जाऊन धर्मसत्ता बलशाली झाली. राजसत्ता व धर्मसत्ता यांच्यात इ.स. ९०० ते १४०० असा दीर्घकाळ संघर्ष सुरु होता. सम्राट चौथा हेन्रीला पोप सातवा समोर शरणागती पत्करावी लागली होती. तर फ्रान्सचा चौथा फिलिपने पोप आपल्या ताब्यात ठेवून दुसऱ्या पोपाला सत्तेवर बसविले होते. राजसत्ता व धर्मसत्ता यांच्यातील संघर्षाने दोघांचीही शक्ती क्षीण झाली

(8) धर्मसत्तेतील भ्रष्टाचार — मध्ययुगात धर्मसत्तेचा पगडा समाजावर होता. याचा फायदा धर्मगुरूंनी घेतला स्वतःचा स्वार्थ

साधण्यासाठी धर्मगुरूंनी अनेक गैरमार्गांचा अवलंब केला. पैसा मिळविण्यासाठी पापमुक्तीचे परवाने काढले. धर्माच्या नावावर प्रचंड माया जमा केली. धर्मगुरू चैनी - विलासी झाले. धर्मगुरूंच्या अशा वर्तनामुळे नीतिमत्ता, सदाचरण मानवतावाद ही धर्माची पायाभूत तत्त्वे दुर्लक्षित झाली. धर्मगुरूंच्या स्वार्थी, विलासी, अनैतिक वर्तनामुळे त्यांची अप्रतिष्ठा झाली. लोकांचा धर्माबद्दल असलेल्या श्रद्धेला तडे गेले. मात्र युरोपात लवकरच फ्रान्स, इंग्लंड, ऑस्ट्रिया, जर्मनी स्पेन, पोर्तुगाल इ. राष्ट्रात समर्थ राष्ट्रराज्यांचा उदय झाला. धर्मसत्तेचे वर्चस्व त्यांनी झुगारून दिले. अशा धर्मसत्तेबद्दल समाजात असंतोष निर्माण झाला. प्रबोधनकाळात धर्मसुधारकांनी अशा धर्मसत्तेचा पर्दाफाश केला व खऱ्या धर्माचे स्वरूप समाजाला विशद केले.

**प्रबोधनाचा प्रसार** - प्रथम विद्येचे पुनरुज्जीवन इटली या देशात झाले व हळूहळू युरोपातील सर्व देशात त्याचा प्रसार झाला. धर्मसंस्थेचा प्रभाव नष्ट झाल्याने विज्ञानाविषयीच्या जुन्या

कल्पना मागे पडल्या. माणसात चिकित्सक
प्रवृत्ती निर्माण झाली विज्ञानाच्या विविध
शाखेत नवनवे शोध लागले कारण ही धर्माच्या
बंधनातून मुक्त झाली व मानवी जीवनाशी समरस
झाली. प्रबोधन सर्वप्रथम सुरुवात फ्लॉरेन्स
रोम, व्हेनीस यासारख्या शहरांतून झाली —

* वाङ्मय — वाङ्मयनिर्मिती ही ग्रीक व लॅटिन
भाषेतच झाली पाहिजे हा संकेत मोडून
काढल्याचे श्रेय रॉजर बेकन यास द्यावे
लागेल प्रबोधनकाळात डान्टे हा
इटालीयन कवी होऊन गेले त्याला प्रबोधन
काळातील वाङ्मयीन निर्मितीचा उद्गाता
मानले जाते — त्याने आपले साहित्य
लॅटिन भाषेऐवजी इटालीयन भाषेत लिहून
इटालीयन भाषेला स्वरूप प्राप्त करून दिले
राष्ट्रीय वाङ्मयनिर्मितीत मॅकियावेली
या इटालीयन राजकीय विचारवंताला महत्त्वाचे
स्थान आहे तो काही काळ इटालीयन
राजाच्या वकील म्हणून काम करीत होता
त्याने The Prince हा ग्रंथ लिहिले

* कला – मध्ययुगात कला ही धर्माची दासी बनली होती आधुनिक कलाकारांनी तिला धर्म-मंदिरा बाहेर काढले. कलेला त्यांनी सजीव बनविले. गिओतो याने प्रथम चित्रकलेस धार्मिक बंधनातून मुक्त केले सामान्य माणूस व आपल्या चित्रकलेचा विषय बनविला लिओनार्डो – द – विन्ची – याने 'लास्ट सपर' व मोनालिसा ही दोन चित्रे काढली ही दोनही चित्रे अमर ठरली. रॅफेल व प्रबोधनकाळातील एक उत्कृष्ट चित्रकार होऊन गेला. तसेच तो स्थापत्य विशारदही होता त्याने रोम येथील जग प्रसिद्ध सेंट पीटर्सबर्गचे चर्च बांधले

* धर्म – मार्टिन ल्यूथर किंगने पोप विरुद्ध युरोपात बंड सुरू केले पापमुक्तीची पत्रे विकण्यास त्याने विरोध केला. लोकांच्या पैशाऐवजी पोपने स्वतःच्या पैशांनी चर्च का बांधू नये असा खडा सवाल त्याने केला ल्यूथरने पोपच्या क्षमापत्रांची होळी केली या घटनांमुळे सर्व युरोपभर मार्टिन ल्यूथर प्रसिद्ध झाला- त्याने धर्माचे खरे स्वरूप लोकांना पटवून दिले बायबलचे जर्मनी भाषेत भाषांतर केले

→ **विज्ञान** - रॉजर बेकनने आधुनिक विज्ञानाचा पाया घातला त्याला प्रबोधनाचा शुक्रतारा म्हणतात. बंदुकीची दारू तयार करण्याचे तंत्रज्ञान त्याने शोधले गणित, खगोल, भूगोल शास्त्राशी त्याने संशोधन केले. तर न्यूटनने 'गुरुत्वाकर्षणशक्ती' चा सिद्धांत मांडला.

Imp

**प्रबोधन चळवळीचे परिणाम** → युरोपात 1453 ते 1600 या काळात झालेल्या प्रबोधन चळवळीने अंधकारमय मध्ययुगाचा शेवट झाला. सरंजामशाही व्यवस्थेचा अंत होऊन औद्योगिक क्रांती घडून आली. प्रबोधन चळवळीने मानवी विचार मुक्त होऊन वैज्ञानिक क्रांती घडून आली. जगाने आधुनिक युगात प्रवेश केला.

(1) **मध्ययुगाचा शेवट** - इ.स. 476 ते 1453

प्रबोधन चळवळीने मध्ययुगाचा शेवट होऊन आधुनिक युगाची सुरुवात झाली. अज्ञान, अंधश्रद्धा यांचा शेवट झाला सरंजामशाही व क्रूर धर्मसत्ता यांचाही शेवट झाला. याकाळी अनेक लेखक विचारवंत, शास्त्रज्ञ यांना खूप छळ करावे लागले होते. पण त्यांच्यामुळे

युरोपची अंधारयुगातून सुटका झाली.

(२) धर्मसत्तेचा पगडा नष्ट —

मध्ययुगात धर्मसंस्थेचा प्रभाव मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगावर पडत होता. धर्मसंस्थेचे हस्तक्षेप जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात होत असे. प्रबोधनामुळे सर्व समाजच जागा झाली. धर्मजातो-विरुद्ध वैयक्तीक व सार्वजनिक पातळीवर बंडखोरी सुरु झाली सामान्य माणूस बुद्धीला जे पटेल त्याचाच स्वीकार करु लागली. जुनी धर्मसत्तांचा जोखड मार्टिन ल्यूथरने उलथून टाकले

(३) देशी भाषांचा उदय — पारंपारिक अरबी, ग्रीक, लॅटीन, फारसी, संस्कृत या भाषा मागे पडून आधुनिक भाषांची प्रगती झाली उदा. इटालियन, फ्रेंच, इंग्रजी, पर्शिया इ. भाषांतून मोठ्या प्रमाणावर साहित्यनिर्मिती झाली त्यामुळे या सर्व भाषांना वाङ्‌मयीन भाषेचा दर्जा प्राप्त झाली

(४) बलशाही राजसत्तांचा उदय - मध्ययुगीन सरंजामशाही संपुष्टात आल्याने राजसत्तेचे महत्व वाढले. मध्ययुगातील राजसत्ता ही धर्मसत्ता, सरंजामदार यांच्या वर्चस्वाखाली होती परंतु प्रबोधनकाळात राजसत्तेवरील

लोकांचे वर्चस्व संपुष्टात आले सरंजामशाही-
पेक्षा राजसत्ता बरी म्हणून लोकांनी राजसत्ता
बळकट करण्यास राजांना मदत केली. त्यामुळे
आधुनिक काळात अनेक देशांत महान राजसत्तांचा
उदय झाला उदा:- फ्रान्सचा - 14 वा लुई
रशियाचा पीटर - द - ग्रेट, प्रशियाचा - राजा
दुसरा फ्रेडरिक.

(5) मानवतावादाचा विकास - मध्ययुगात मनुष्य
अनेक बंधनात जखडलेला होता. धर्मसत्ता,
सरंजामशाही यामुळे तो एक पदार्थ ठरला
होता. अनेक बंडखोर विचारवंत, सुधारक,
लेखकांनी मानवतावादास उत्तेजन दिले
मानवकेंद्रित साहित्य, कला, विज्ञान, धर्म
उदयास आले प्रबोधनाच्या चळवळीमुळे
माणूस सर्व बंधनातून मुक्त झाला

(6) बुद्धी प्रामाण्यवाद - मध्ययुगीन कालखंडात
ते क्रूर धर्मसत्ता व सरंजामशाही राजवट
यामुळे मानवी स्वातंत्र्य संपुष्टात आले
होते आपल्या अनिर्बंध वर्चस्वाखाली
धर्मगुरूंनी अनेक खोटी धार्मिक

धुळसडल्या परंतु पुढे स्वातंत्र्य युद्धात परेक्षा ते करणारा प्रत्येक गोष्ट सप्रयोग तपासून पाहणारा बुद्धिवादी निर्माण झाला या वर्गीने प्रयोगशीलता व बौद्धिक स्वातंत्र्याला प्राधान्य दिले.

(7) वैचारिक परिवर्तन — प्रबोधनामुळे मानवी विचार मुक्त झाला. वैचारिक गुलामगिरी नष्ट झाली. आचार व विचार स्वातंत्र्यास महत्व प्राप्त झाले मानवतावाद व व्यक्तिस्वातंत्र्या-च्या कल्पना प्रसारची झाली यामुळे साहित्य, विज्ञान कला या क्षेत्रांत अभूतपूर्व बदल झाले. वैचारिक परिवर्तनाने आधुनिक युगाची सुरुवात झाली

(8) औ. क्रांती — युरोपमध्ये अनेक नवनवीन शोध लागून उत्पादनात आमूलाग्र बदल झाले. १७६० मध्ये प्रथम कापड उद्योगात क्रांती झाली —

(9) नवसाम्राज्यवादाचा उदय — प्रबोधन चळवळीमधून औ. क्रांतीचा व औद्योगिक क्रांतीमुळे नव-साम्राज्यवादाचा उदय घडून आला

(10) राष्ट्रवादाचा उदय - प्रबोधन चळवळीमुळे राजा व प्रजा यांच्यात जवळीकता वाढीस लागली. आपल्या प्रांताविषयी, राष्ट्राविषयी प्रेम वाढीस लागले. आपल्या राज्याच्या रक्षणासाठी राजा व प्रजा एकत्र येऊ लागली काही सम्राटांनी स्थानिक भाषांचा पुरस्कार करून व्यापारी मिळविल्या राज्यकर्त्यांची राष्ट्रनिष्ठा वाढीस लागली पुढे राष्ट्रवादी भावना वाढीस लागून फ्रेंच, अमेरिका, इंग्लंड, जर्मनी इटली, स्पेन ऑस्ट्रिया उदयास आल्या.

अभ्यासाच्या दृष्टीने

↳ मानवी इतिहासाचे तीन कालखंड

* प्राचीन कालखंड - प्रारंभापासून इ.स. 476 पर्यंत
* मध्ययुगीन कालखंड - इ.स. 476 ते 1453

वैशिष्ट्ये

मरगळलेला युरोपियन समाज, सरंजामशाही धर्मसंस्थेचे प्राबल्य, ज्ञान विज्ञान व कला यांची प्रगती थांबली, धर्मयुद्धे

* आधुनिक कालखंड - इ.स. 1453 ते आजपर्यंत

(ब) धर्मसुधारणा चळवळ - मार्टिन ल्युथर किंग (1483 ते 1546)

प्रबोधन चळवळीमुळे युरोपात धर्मसुधारणा चळवळ सुरू झाली. धर्मसुधारणा म्हणजे केवळ धार्मिक बदल नव्हे तर या चळवळीने समाज जीवनात आमुलाग्र बदल घडविण्याचे कार्य केले.

येशू ख्रिस्ताने स्थापित केलेली धर्मसंस्था सर्वश्रेष्ठ असुन धर्मगुरू हे त्यांचे प्रतिनिधी आहेत अशी विचारप्रणाली त्या काळात दृढ झालेली होती. तसेच राजकीय सत्तेपेक्षा धर्मसत्ता श्रेष्ठ आहे म्हणून चर्च व पोप यांची अनिर्बंध सत्ता वाढली. अशा स्थितीत धर्मसंस्थेबरोबर नवयुगातील प्रेरणांचा संघर्ष होणे स्वाभाविक होते. धर्मसंस्थेबरोबर झालेल्या संघर्षाची

(अ) कारणे पुढील प्रमाणे ① राजकीय कारण - धर्मगुरूंनी आपले धार्मिक क्षेत्र सोडून इतर क्षेत्रातील सत्ताप्राप्तीची महत्त्वाकांक्षा धरली राज्यावर नियंत्रण ठेवणे त्याप राज्यपद बहाल करणे ~~राज्या~~ राज्याच्या अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप करणे यामुळे संघर्ष वाढला

② आर्थिक कारण - 13 व्या शतकातील पोप 8 वा आणि इंग्लंड, फ्रान्सचे राजे यांच्यात आर्थिक प्रश्नावरून संघर्ष सुरू झाला राजाने धर्मसंस्थेच्या उत्पन्नावर बसविलेल्या करास पोपने विरोध केला त्यामुळे पोपला विरोध करणाऱ्या राजाला पदच्युत करणे, धर्म बहिष्कृत करणे, व्यापारी, शेतकरी, सरदार यांच्यावर विविध कर लादल्यामुळे संघर्षात वाढ झाली

③ धर्मसंस्थेतील भ्रष्टाचार - पोप व चर्च यांनी प्रचंड संपत्ती मिळविल्यामुळे धर्मगुरू चैनी, विलासी, अनैतिक कृत्यांत रममाण झाले. पोप 6 वा अलेक्झांडर (1492-1503) पोप 10 वा लुई (1513-21) हे दुराचारी होते. पापमुक्तीचे परवाने देणे, स्त्रिया व भिक्षुणी यांच्याशी अनैतिक संबंध ठेवणे, पैसा उकळणे इ. धर्मसंस्थेवरील विश्वास नष्ट झाला

④ जनतेचा विरोध - मध्ययुगीन समाजाने पोपच्या अनियंत्रित सत्तेला, भ्रष्टाचाराला, ढोंगबाजीला कडाडून विरोध केला

या सर्व कारणांमुळे धर्मसुधारणेची आवश्यकता निर्माण झाली

(ब) पार्श्वभूमी – धर्मसुधारणा चळवळ 11 व्या शतकात सुरू आणि 14 व 16 व्या शतकात तीव्र मोठे स्वरूप प्राप्त झाले फ्रान्स मधील पीटरवाल्डो याने धर्मगुरुवर टिका करून ~~धर्मसंस्थेची~~ धर्मग्रंथाची फ्रेंचभाषेत भाषांतरे केली त्यामुळे त्याचा धर्मसंस्थेने छळ केला

जॉन वायक्लिफ (1320-1384) हा धर्मसुधारणेचा पहिला पुरस्कर्ता याने धर्मग्रंथाची इंग्रजीत भाषांतरे केली त्यामुळे धर्मशास्त्राचा अर्थ सर्वसामान्य माणसाला समजू लागला

रुचलीन (1369-1415) याने वायक्लिफ मधील चुका दाखविल्या त्यालाही त्रास सहन करावा लागला

इरॅसमस (इरॅसमस -1469-1536) याने मूर्खस्तुती या ग्रंथात धर्मसंस्था व धर्मगुरु यांच्यावर उपरोधिक टिका केली- लोकांनी सदाचरण करावे, सामोपचाराने वागावे असा उपदेश केला

वरील धर्मसुधारकांच्या तर्कशुद्ध वैचारिक क्रांतीने ऐतिहासिक कार्य केले त्याला समाजाने पाठिंबा दिला म्हणून युरोपात 16 व्या शतकात धर्मसुधारणा चळवळीचा उदय झाला –

(क) धर्मसुधारणा चळवळ व मार्टिन ल्यूथर (1483-1546)

याला धर्मक्रांतीचा नेता म्हणतात त्याने बुद्धीनिष्ठ आधिष्ठान देऊन चळवळीस चालना दिली त्याने रोमन कॅथॉलिक धर्मसंस्थेच्या सर्वंकष वर्चस्वाला प्रचंड धक्का देण्याचे मोठे कार्य केले तो विटेनबर्ग विद्यापीठात धर्म व तत्वज्ञानाचा प्राध्यापक होता त्याने अनेक विचारवंतांचे ग्रंथ आणि धर्मशास्त्राचा लॅटिन भाषेचा सखोल अभ्यास केला आणि ईश्वरावर आस्था ~~वर~~ श्रद्धा ठेवल्यास मुक्ती मिळते असा सिद्धांत मांडला

क्रांतीची ठिणगी – रोम येथील सेंट पीटरचे चर्च बांधण्यासाठी त्या वेळचा धर्मगुरु 10 वा लिओ याने पापमुक्तीचे दाखले विकून पैसे जमविण्याचे ठरविले म्हणून

ल्यूथरने पापमुक्तीच्या दाखल्याची कल्पना अशास्त्रीय

आणि आध्यात्मिक आजारामुळे त्यांनी विरुद्ध 31 ऑक्टो. 1517 विटेनबर्ग येथील चर्चच्या मंदिरावर 95 कलमी पत्र लिहून बंड पुकारले त्यामुळे धर्मसंस्थेत आणि जर्मनीत मोठी खळबळ उडाली त्याचा परिणाम म्हणून त्यांना धर्मबहिष्कृत करून नोकरीतून बडतर्फ केले धर्मगुरूंनी त्यांची चळवळ मोडीत काढण्याचे ठरविले

पण ल्यूथरने बायबल व परमेश्वराचे श्रेष्ठतेचे, सदाचाराचे तत्त्व लोकांना पटवून दिले त्यामुळे जर्मनीत चळवळीला यश मिळाले आणि इ.स. 1555 शांततानेह होऊन लोकांना धर्मस्वातंत्र्य मिळाले या चळवळीमुळे पोपच्या सत्तेचा ऱ्हास झाला आणि प्रोटेस्टंट पंथाच्या समाजाचा मोठा पाठिंबा मिळाला राजसंस्था ही धर्मसंस्थेपेक्षा श्रेष्ठ आहे या प्रचारामुळे अनेक देशात राष्ट्रवादी चळवळी निर्माण झाल्या

मार्टिन ल्यूथरच्या धार्मिक चळवळीला आणि त्याच्या प्रोटेस्टंट या नव्या पंथाला प्रचार युरोपातील इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स देशात होऊन कॅथॉलिक पंथाची सत्ता कमी झाली

फ्रान्समध्ये जॉन कॅल्व्हिन याने कॅल्व्हिन पंथ स्थापन केले इंग्लंडमध्ये धर्मसुधारक जॉन वायक्लिफने केले

③ धर्मसुधारणा चळवळीचे परिणाम ① अनेक छोटे मोठे धर्मपंथ उदयाला आले

② राजकीय क्षेत्रात पोपची सत्ता कमी झाली आणि राजाला महत्त्व प्राप्त झाले

③ ग्रंथनिर्मिती होऊन शिक्षणाला महत्त्व वाढले

④ युरोपमध्ये धर्मस्वातंत्र्य व उदारमतवादाला उत्तेजन मिळाले